# श्रीगुरुवचन

तुम्ही तुमच्या स्वतःचे सर्वात चांगले मित्र बना.

वेळ निर्माण करा,
जेणेकरून, तुम्ही जाणीवपूर्वक मौनाचे पालन करू शकाल
ज्यायोगे तुमच्या शरीराला आणि तुमच्या आत्म्याला
विसावा मिळेल.

~ गुरुमाई चिद्विलासानंद

***

तुम्ही तुमच्या स्वतःचे सर्वात चांगले मित्र बना.

वेळ काढा, जेणेकरून तुम्ही तुमच्या दिव्यतेचे चिंतन करू शकाल
आणि ही गोष्ट हृदयात खोलवर रुजवू शकाल
की, तुम्हाला भगवंताचा आशीर्वाद प्राप्त आहे.

~ गुरुमाई चिद्विलासानंद

***

तुम्ही तुमच्या स्वतःचे सर्वात चांगले मित्र बना.

प्रयत्नपूर्वक अशा वेळेची रचना करा, जेव्हा तुम्ही ध्यान करू शकाल
आणि अंतरी ज्ञानसरोवर प्राप्त करू शकाल,
जे आत्म्याचे शाश्वत ज्ञान आहे.

~ गुरुमाई चिद्विलासानंद

***

तुम्ही तुमच्या स्वतःचे सर्वात चांगले मित्र बना.

तुमच्या वेळेचे प्राधान्य अशा प्रकारे निश्चित करा की,
बाह्य जगतातील या किंवा त्या गोष्टीच्या लालसेपायी
क्षणांशदेखील वाया न घालवता
तुम्ही तुमच्या जीवनाच्या उद्देशाची परिपूर्ती करू शकाल.

~ गुरुमाई चिद्विलासानंद

***

तुम्ही तुमच्या स्वतःचे सर्वात चांगले मित्र बना.

तुमच्या वेळेच्या रूपरेखेची आखणी अशा प्रकारे करा की,
तुम्ही तुमच्या पवित्र वातावरणात व्याप्त असलेले
चमचमणारे चैतन्य तुमच्या श्वासात भरून घ्यावे,
आणि तुमच्या अभ्यासांद्वारे अर्जित सत्कर्मे
उच्छ्वासासह बाहेर प्रवाहित होऊ द्यावीत.

~ गुरुमाई चिद्विलासानंद

***

तुम्ही तुमच्या स्वतःचे सर्वात चांगले मित्र बना.

वेळेचे नियोजन अशा प्रकारे करा की,
तुम्हाला आलेले श्रीगुरूंबद्दलचे अनुभव तुम्ही
तुमच्या हृदयमंदिरात प्रतिष्ठापित करू शकाल.

~ गुरुमाई चिद्विलासानंद

***

तुम्ही तुमच्या स्वतःचे सर्वात चांगले मित्र बना.

वेगळा वेळ काढा
जेणेकरून तुम्ही तुमच्या पूर्वकल्पित सीमिततांचा त्याग करू शकाल
आणि त्याऐवजी तुमच्या प्रयत्नांच्या भव्यतेचा तसेच
कृपेच्या रहस्यमयी लीलांचा उत्सव साजरा करू शकाल.

~ गुरुमाई चिद्विलासानंद

***

तुम्ही तुमच्या स्वतःचे सर्वात चांगले मित्र बना.

वेळेचा उपयोग अशा प्रकारे करा की, ज्यायोगे
तुम्ही ती कार्ये पूर्ण करू शकाल
जी करण्याचे वचन तुम्ही स्वतःला दिले आहे
जेणेकरून, मग तुम्ही निवांतपणे बसून
या गोष्टीची प्रशंसा करू शकाल की, तुमच्या प्रयत्नांमध्ये प्राक्तनाचा सहभाग आहे.

~ गुरुमाई चिद्विलासानंद

***

तुम्ही तुमच्या स्वतःचे सर्वात चांगले मित्र बना.

तत्क्षणी स्वतःला सावरायला शिका—स्वाभाविकपणे, तत्परतेने—
अगदी तसेच जसे तुमच्या चेहऱ्यावर तेव्हा हास्य उमलते,
जेव्हा तुमचे हृदय प्रशांत असते आणि
श्रीगुरूंच्या प्रेमाने ओथंबलेले असते.

~ गुरुमाई चिद्विलासानंद

***

सद्गुरुनाथ महाराज की जय!

© २०२३ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.